**पत्र**

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी.

क्रमांकःपीओअेस. १०८४/३५६/विक१. स्वाते.

सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-१६/६/१९८४.

विषय:-भूमिगत स्वा. सैनिकांना पेन्शन व्यतिरिक्त इतर आर्थिक सहाय्य देण्याबाबत.
संदर्भ:-शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. पीओअेस-१२८३/भू. स्वा. सै./विक१. स्वाते, दि. ३.१२.१९८३.

वरील शासन निर्णयानुसार भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांना पेन्शन व इतर आर्थिक सहाय्य देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. तथापि स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीने पात्र ठरविलेल्या भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांना दि. १५.८.८३ पासून पेन्शन देण्याचे मान्य केले आहे. भूमिगतांच्या प्रकरणांची छाननी करण्याचे काम सुरू झाले आहे. स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीने पेन्शनसाठी पात्र ठरविलेल्या भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांना पेन्शन मंजूरीचे आदेश निर्गमित करण्यांत आल्यानंतर त्यांना इतर आर्थिक सहाय्य देण्यात यावे. सदरहू आर्थिक सहाय्य दि. १५.८.१९८३ वा त्यानंतर झालेल्या प्रसंगाच्या संदर्भात असावे.

(स्वाक्षरी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.